*Indian Streams Research Journal*
Volume 2, Issue. 6, July 2012
**ISSN:-2230-7850**

Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# डेक्कन जमखाना क्लबचे कीडा विषयक योगदानाचा अभ्यास

अनिल भावनराव चव्हाण , अजय देवराव पवार

शारीरिक शिक्षणशास्त्र विभाग,
सिंद्यानिया विद्यापीठ
लिंरीख लरीख रिक्षरीरिंपर

**प्रस्तावना:**

आजच्या स्पर्धात्मक युगामध्ये वेगवेगळ्या क्षेत्रांपैकी क्रीडा क्षेत्र हे एक महत्त्वाचे क्षेत्र आहे. त्यासाठी अमेरिका, रशिया, फ्रान्स, चीन आणि भारत यांसारखे अनेक देश आपापली क्रीडा कामगिरी सुधरविण्यासाठी सतत प्रयत्नशील असून वेगवेगळ्या प्रकारचे क्रीडा उपक्रम राबवित असतात. उदाहरण: आपल्या देशामध्ये क्रीडा क्षेत्राला उत्तेजन देणे आणि विविध क्रीडा पट्टूंच्या नैपूण्यामध्ये विकास करणे इत्यादी उद्देश समोर ठेऊन इ. स. १९८४ मध्ये भारतीय खेळ प्राधिकरण नामक क्रीडा संस्थेची स्थापना करण्यात आली. (भारतीय खेल प्राधिकरण)१ क्रीडा क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावण्यात वेगवेगळ्या क्रीडा संस्था, क्रीडा संघटना परदेशात त्याचप्रमाणे भारतात कार्यरत आहेत. उदाहरण: मोहनबगान (कोलकता), अंबाबाई तालिम संघ (मिरज), हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ (अमरावती), डेक्कन जिमखाना क्लब (पुणे) आणि महाराष्ट्र मंडळ (पुणे) यांसारख्या अनेक संस्था क्रीडा क्षेत्रात मोलाची कामगिरी बजावित आहेत.

कै. श्री. शिवरामपंत दामले यांनी देशातील तरूण पिढी केंद्रबिंदू ठरवून त्यांना शारीरिक व मानसिक दृष्ट्या सुदृढ करणे असा उद्देश समोर ठेऊन इ. स. १९२४ साली महाराष्ट्रीय मंडळ नावाची संस्था पुणे शहरामध्ये स्थापन केली. (महाराष्ट्रीय मंडळ)२ जयंत ढगेकर यांनी इ. स. १९९१ साली पुणे विद्यापीठामध्ये एम. पी. एड. पदवीकरिता 'महाराष्ट्रीय मंडळाचा चिकित्सक अभ्यास' या संशोधन विषयावर लघुशोध प्रबंध सादर केला. त्यातील निष्कर्षांनुसार महाराष्ट्रीय मंडळ संस्थेचे शारीरिक शिक्षण आणि क्रीडा क्षेत्रात फार मोठे योगदान आहे. असे निदर्शनास येते.

कै. श्री. अनंत कृष्णा आणि अंबादास कृष्णा या वैद्य बंधूंनी देशातील नागरिकांमध्ये विशेषत: तरूण पिढीमध्ये धर्म, जात आणि वंश यांऐवजी शारीरिक शिक्षण आणि क्रीडा क्षेत्राबद्दल जागृती निर्माण करणे, त्यामध्ये रूची वाढविणे, त्याचबरोबर शारीरिक शिक्षण, आरोग्य, आहार, मनोरंजन, क्रीडा इत्यादींसारख्या क्षेत्रामध्ये संशोधन कार्य राबविणे यांसारखे उद्देश समोर ठेऊन कार्यरत असलेल्या श्री. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ या क्रीडा संस्थेची स्थापना इ. स. १९१४ साली अमरावती शहरामध्ये स्थापन केली. (हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ)३ कु. देवपारे सुलभा यांनी इ. स. १९९७ साली पुणे विद्यापीठामध्ये एम. पी. एड. पदवीकरिता 'श्री. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे क्रीडा विकासासाठी होणारे योगदान' या संशोधन विषयावर लघुशोध प्रबंध सादर केला होता. त्यातील निष्कर्षांमधून श्री. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे क्रीडा विकासासाठी फार मोठे योगदान आहे त्याबद्दलची माहीती निदर्शनास येते.

इ. स. १९८७ साली जमशेदपूर येथे भारतातील फुटबॉलचा एकंदरीत दर्जा वाढविणे हा उद्देश समोर ठेऊन टाटा स्टील स्पोर्ट्स फाऊंडेशनतर्फे टाटा फुटबॉल अकॅडमीची स्थापना करण्यात आली. (टाटा फुटबॉल अकॅडमी)४

वरील क्रीडा संस्थांप्रमाणेच पुणे शहरात 'डेक्कन जिमखाना क्लब' ही एक क्रीडा संस्था कार्यरत आहे. या डेक्कन जिमखाना क्लबने क्रीडा क्षेत्रात मोलाची कामगिरी बजावित शताब्दी पूर्ण केली आहे. या डेक्कन जिमखाना क्लबचे क्रीडा विषयक योगदानाचा अभ्यास केल्यास समाजाला त्याचे महत्त्व पटेल. त्याचबरोबर क्रीडा क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या संस्थांना हे संशोधन मार्गदर्शक ठरेल.

**डेक्कन जिमखाना क्लबच्या स्थापनेचा इतिहास**

व्यापाराच्या निमित्ताने हिंदुस्थानात आलेले इंग्रज मुंबईच्या भूमीत क्रिकेटची मुळे रोवायला कारणीभूत ठरले. मुंबई पाठोपाठ हे क्रिकेटचे मूळ पुण्यातही वृद्धिंगत झाले. आरंभी पुण्यातील क्रिकेट हे लष्करी गोरे अधिकारी व कॅन्टोंमेंट यांपुरतेच मर्यादित होते. त्यांच्या पाठोपाठ गावातील तरूणही हळूहळू क्रिकेटमध्ये रस घेऊ लागले. सुरूवातीच्या काळात क्रिकेट वेगवेगळ्या ठिकाणी, मुख्यत्वे माळरानात काही तरूण मंडळी खेळत परंतु त्याला योग्य ते स्वरूप नव्हते, त्यामुळे क्रिकेटसाठी आवश्यक मैदानाची शोध मोहिम सुरु झाली. इ. स. १९०६ मध्ये पुण्याच्या पश्चिमेला नदीपलीकडे

**Please cite this Article as :** अनिल भावनराव चव्हाण , अजय देवराव पवार डेक्कन जमखाना क्लबचे कीडा विषयक योगदानाचा अभ्यास : **Indian Streams Research Journal (Juiy ; 2012) A**

असलेल्या भांबुर्डा गावठाणातील शिरोळे पाटील यांच्या मालकीच्या माळरानापर्यंत येऊन ही शोध मोहिम थांबली, हेच माळरान साफसुफ करून त्यावर शिस्तबद्ध खेळ सुरू झाला. सुरूवातीला तेथे 'यंग मेन्स क्रिकेट क्लब' होता. या क्लबच्या सभासदांतून दोन विभाग होऊन त्यापैकी एक 'पुना यंग क्रिकेटर्स हिंदू जिमखाना' व दुसरा 'डेक्कन जिमखाना क्लब' या संस्था अस्तित्वात आल्या. अशा रितीने दिनांक २३ ऑक्टोबर १९०६ रोजी 'डेक्कन जिमखाना क्लबचा' उदय झाला. (डे.जि.क्लब)५ लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी याकामी महत्त्वाची भूमिका पार पाडली. १४ एकराचा परिसर असलेला हा डेक्कन जिमखाना क्लब महाराष्ट्र राज्यातील पुणे शहरातील अतिशय गजबजलेल्या डेक्कन (संभाजीनगर) परिसरात वसलेला आहे. (डे. जि. क्लब)६

डेक्कन जिमखाना क्लब ही पुण्यातील एक आद्य क्रीडा संस्था समजण्यात येत असून खेळांच्या निरनिराळ्या विभागांमध्ये आज ज्या चांगल्या प्रथा आपल्या निदर्शनास येतात, त्यांचा उगम डेक्कन जिमखाना क्लबमध्ये झाला आणि डेक्कन जिमखाना क्लब ही क्रीडा संस्था निरनिराळ्या नव्या उपक्रमांची प्रवर्तक ठरली आहे. ही गोष्ट संस्थेसाठी भूषणावह आहे.

डेक्कन जिमखाना क्लबचे पहिले सरचिटणीस, लोकमान्य टिळकांचे जेष्ठ अनुयायी व पुण्यनगरीचे सुपुत्र श्री. न. चि. उर्फ तात्यासाहेब केळकर व श्री. बंडोपंत भाजेकर हे होते. इ. स १९११ साली डेक्कन जिमखाना क्लबला श्री. एस. आर. उर्फ आप्पासाहेब भागवत या कष्टाळू आणि संस्थेला सर्वस्वी वाहून घेणाऱ्या कार्यकर्त्यांचा हातभार लागला. त्यांनी डेक्कन जिमखाना क्लबची सर्वांगिण उन्नती साधली. इ. स. १९२७ पर्यंत तेच डेक्कन जिमखाना क्लबच्या सरचिटणीसपदी विराजमान होते आणि त्यादरम्यान त्यांनी महत्त्वपूर्ण असे पाया भरणीचे आणि प्रगतीचे टप्पे पूर्ण केले. (गोरे व लोखंडे, २००६)७ त्यांनी डेक्कन जिमखाना क्लबमध्ये विकास कामाची योजना तयार केली. शिरोळे पाटील यांच्याकडून १९८ वर्षांच्या भाडेपट्ट्याने घेतलेल्या जागेची नीट आखणी करून ३२ एकर जागेत, १४ एकर जागा खेळांच्या मैदानाकरीता सोडण्यात आली व उरलेल्या जागेत कमीतकमी ४,००० चौ. फूट प्लॉट पाडून ते सदस्यांना देण्यात आले आणि एक नवीन वसाहत तयार झाली.

या वसाहतीचे उद्घाटन दिनांक ३१ ऑक्टोबर १९२२ रोजी, मुंबई राज्याचे बांधकाम खात्याचे प्रमुख, सर गुलाम हुसेन हिदायतुल्ला यांच्या हस्ते झाले. या वसाहतीचा कारभार पाहण्यासाठी सदस्यांनी कॉलनी पंचायत स्थापन केली. त्याचबरोबर इ. स. १९२२-२३ च्या सुमारास को. हौसिंग सोसायटी स्थापन करण्यात आली. डेक्कन जिमखान्याची वसाहत ज्याप्रमाणे जिमखान्यातून निर्माण झालेली पहिली वसाहत त्याचप्रमाणे ही हौसिंग सोसायटी देखील मुंबई इलाख्यातील पहिली को. हौसिंग सोसायटी होय. (गोरे व लोखंडे, २००६)८ त्याचबरोबर वसाहतीमधल्या महिलांच्या मनोरंजनासाठी 'वनिता विश्राम' सुरू करण्यात आले. इ. स. १९२८-२९ मध्ये शिरोळे पाटील यांच्याबरोबरचा भाडेपट्टा (करार) हा निरंतरचा करण्यात आला.

डेक्कन जिमखाना क्लबची ध्येय उद्दिष्टे, घटना व सभासदत्व रचना अभ्यास.

डेक्कन जिमखाना क्लबची ध्येय उद्दिष्टे

डेक्कन जिमखाना क्लबच्या घटना व नियम यांतील नोंदीनुसार ध्येय उद्दिष्टे खालीलप्रमाणे (घटना व नियम, १९६४)८

- व्यायाम, खेळ व खिलाडूवृत्ती यांची जोपासना व वाढ करणे.
- सर्व तऱ्हेच्या देशी व विदेशी खेळांची व व्यायाम पद्धतीची सोयी सुविधा निर्माण करणे.
- आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये हिंदूस्थानने भाग घ्यावा, त्यासाठी प्रयत्न करणे.
- देशी खेळांना पद्धतीशीर स्वरूप देऊन ते वाढवून लोकप्रिय करणे.
- व्यायाम, खेळ व खिलाडूवृत्ती यासंबंधी उपयुक्त वाङ्मय प्रसिद्ध करून त्याचा प्रसार करणे.
- स्थावर मिळकत संपादने व धारण करणे.
- निधी व कर्ज उभारणे, रक्कमा उभारणे, कर्ज देणे.
- जमिनी व इमारती यांची खरेदी, विक्री व भाड्याने देणे.

डेक्कन जिमखाना क्लबच्या घटनेचा अभ्यास

डेक्कन जिमखाना क्लबची स्थापना इ. स. १९०६ साली झाली. त्यावेळेस सभासदांनी मिळून डेक्कन जिमखाना क्लबचे व्यवस्थापन, दैनंदिन कारभार हा सुरळित चालावा म्हणून काही नियमांची आखणी केली. त्यामध्ये सभासदत्व, क्रीडा विभाग, त्यांचे शुल्क, पदाधिकारी, वेगवेगळ्या समित्या, त्यांचे कार्येइत्यादी सारख्या महत्त्वाच्या गोष्टींचा समावेश होता. कालांतराने सर्व परिस्थिती ही बदलत असल्यामुळे डेक्कन जिमखाना क्लबच्या घटनेतही काही बाबतीत बदल करणे ही गरज होती व त्यानुसार साधारण सभेमधील मान्यतेने वेळोवेळी, आवश्यकतेनुसार काही बाबींमध्ये बदल करण्यात आले. त्यापैकी काही बदल पुढीलप्रमाणे

- शुल्क

वाढती महागाई, बदलती परिस्थिती आणि व्यवहारिक गरजा या पातळीवर जमा व खर्च यांचा ताळमेळ जमेनासा झाला तेव्हा क्रीडा समिती व नियामक मंडळ यांच्यातील समन्वय आणि सभासदांच्या सहकार्यामुळे वेळोवेळी शुल्कामध्ये वाढ होत गेली.

- निवडणूक पद्धती

इ. स. १९९३ ते १९९४ च्या दरम्यान डेक्कन जिमखाना क्लबच्या निवडणूक पद्धतीमध्ये बदल करण्यात आला. निवडणूक पद्धतीमध्ये पोस्टल बॅलेट पद्धत वापरली जात होती. परंतु त्याऐवजी नवीन निवडणूक पद्धतीमध्ये सभासदांनी क्लबच्या आवारात स्वत: ओळखपत्रासहित हजर राहून, आपले मतदान करणे अनिवार्य करण्यात आले व निवडणूक दर दोन वर्षाऐवजी तीन वर्षांसाठी करण्यात आली. (तुळपुळे आनंद, २००६) ९

- बिलियर्ड्स विभाग

डेक्कन जिमखाना क्लबमध्ये इ. स. १९२७ ते १९२८ च्या सुमारास सरू झालेल्या बिलियर्ड्स विभागाचे प्राथमिक स्वरूप हे एक 'विशेष खाते' असे होते. पुढे, त्यामध्ये बदल करण्यात येऊन दिनांक २५ जानेवारी, २००० पासून हे खाते इतर क्रीडा विभागांप्रमाणेच डेक्कन जिमखान्यात विलीन करण्यात आले. दिनांक १२ मार्च, २००० रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत सर्वानुमते मान्यता देण्यात आली. दिनांक १ एप्रिल २००० पासून सदर विभागाचे कामकाज सरचिटणीसांद्वारे होऊ लागले. (लोकरे विश्वास, २००६) १०

मि. विल्सन जोन्स यांनी आपल्या बिलियर्ड्स खेळाची सुरुवात डेक्कन जिमखाना क्लब येथेच केली व पुढे दोन वेळा जागतिक, अजिंक्यपद मिळविले ही एक अभिमानास्पद गोष्ट आहे. (गोरे व लोखंडे, २००६)११

- पदाधिकारी कार्यकालावधी मर्यादा

सप्टेंबर २००७ मध्ये झालेल्या घटनेतील बदलानुसार ठरविण्यात आले की, कोणत्याही व्यवस्थापन समितीचा सदस्य किंवा पदाधिकारी हा सलग दोन वेळा म्हणजेच सहा वर्षेएकाच पदावर कार्यरत असू शकतो. त्यानंतर इतर पदावर अथवा इतर समिती सदस्य म्हणून कार्यरत राहता येईल.

डेक्कन जिमखाना क्लबमधील सभासदत्व रचना

डेक्कन जिमखाना क्लबमध्ये कोणत्याही जाती, धर्म, पंथाच्या व्यक्तीस सभासद होता येते. आरंभी डेक्कन जिमखाना क्लबच्या घटनेनुसार खालील सभासद वर्ग अस्तित्वात होते. (घटना व नियम, १९६४) १२


| | | |
|---|---|---|
| ✻ आश्रय दाते | ✻ आजीवन सभासद | ✻ स्त्री सभासद |
| ✻ हितकर्ते | ✻ प्राथमिक सभासद | ✻ बाल सभासद |
| ✻ शाखा सभासद | ✻ विद्यार्थी सभासद | ✻ हंगामी |

सद्यस्थितीत डेक्कन जिमखाना क्लबमध्ये पुढीलप्रमाणे सभासद वर्ग आहेत. (डे. जि. क्लब) १३

| | |
|---|---|
| ✻ कायम सभासद | ✻ तात्पुरते सभासद |
| ✻ आजीवन सभासद | ✻ अनुवंशिक आजीवन सभासद |
| ✻ सन्मान सभासदत्व | ✻ सांघिक (कॉर्पोरेट) सभासदत्व |

✻ इतर क्लब अथवा संस्थांबरोबर केलेले संलग्नीकरण

डेक्कन जिमखाना क्लबच्या कार्यपद्धतीचा अभ्यास




आकृती क्र. १
प्रशासन पद्धत, डेक्कन जिमखाना

डेक्कन जिमखाना क्लबचा एकूण क्लबचा एकूण कारभार विश्वस्त मंडळ व नियामक मंडळ आपापल्या क्षेत्रानुसार पाहतात.

- कार्यकारी समितीचे सदस्य.
- या शिवाय क्रीडा समितीच्या शिफ़ारशीने विशेष कार्यासाठी नियामक मंडळाने नेमलेले जादा चिटणीस.

ब) डेक्कन जिमखाना क्लबच्या अधिकाऱ्यांची कामे

१) नियमाक मंडळाने निवडणुकीनंतर आपल्या पहिल्या सभेत एक अध्यक्ष व दोन उपाध्यक्ष निवडावेत. अध्यक्ष साधारण सभेच्या बैठकीत अध्यक्ष राहील. अध्यक्ष गैरहजर असतील तर उपाध्यक्षांपैकी एकजण अध्यक्ष राहतील. अध्यक्ष व उपाध्यक्ष गैरहजर असतील तर सभेने आपल्यापैकी एक व्यक्ती 'अध्यक्ष' नेमून काम चालवावे.

२. नियामक मंडळाने पहिल्या सभेच्या वेळी एक किंवा अधिक अंतर्गत हिशेब मपासणीस जिमखान्याच्या सभासदांतून नेमावे. त्यांनी नियामक मंडळाच्या अधिकाराखालील खात्यांचे, तसेच विश्वस्त मंडळ, कॉलनी पंचायत व विशेष खाती यांचे हिशेब तपासावे आणि तपासणीचे प्रतिवृत्त दर तीन महिन्यांनी नियामक मंडळास सादर करावे.

३. या शिवाय कायद्याने जरूर असलेला हिशेब तपासणीस साधारण सभेने आपल्या पहिल्या बैठकीत नेमून त्यांचे वेतन ठरवावे. त्यांनी नियामक मंडळाच्या अधिकाराखालील खात्यांचे, तसेच विश्वस्त मंडळ, कॉलनी पंचायत व विशेष खाती यांचे हिशेब तपासावे. या हिशेब तपासणीसाने आपला वार्षिक अहवाल मंडळामार्फत साधारण सभेत सादर करावा.

४. नियामक मंडळ, क्रीडा समिती, विश्वस्त मंडळ, कॉलनी पंचायत, विशेष खात्यांचे व्यवस्थापक मंडळ व कार्यकारी समिती यांचे सभासद हिशेब तपासणीसाचे जागेस पात्र नाहीत.

५. 'सरचिटणीस' हे डेक्कन जिमखाना क्लबचा मुख्य अधिकारी राहील. त्यांनी क्रीडा समिती व नियामक मंडळ यांच्या आदेशानुसार कार्यकारी समितीच्या मदतीने कारभार चालवावा. त्यांची कामे मुख्यत्वे खालीलप्रमाणे राहतील. (परिशिष्ट 'झ'- इ.स.१९०६ ते इ.स.२००६ या शंभर वर्षातील सरचिटणीसांची यादी)

✻ क्रीडा समिती, नियामक मंडळ व साधारण सभा यांच्या बैठकीत कामाचा वृत्तांत ठेवणे.
✻ सर्व पत्रव्यवहार पाहणे व त्याचे दप्तर ठेवणे.
✻ विश्वस्तांकडे सुपूर्त केलेला भाग वगळून डेक्कन जिमखाना क्लबच्या सर्व मालमत्तेवर नियंत्रण ठेवणे.
✻ सर्व नोकर वर्गाच्या कामावर नियंत्रण व देखरेख ठेवणे.
✻ विशेष खात्यांचे काम नियमांप्रमाणे चालले आहे की नाही? हे पहाणे व यासाठी जरूर तर त्यांच्या कारभारी मंडळांच्या सभांना हजर राहणे.
✻ डेक्कन जिमखाना क्लबच्या वेगवेगळ्या खात्यांच्या कामाच्या वेळा ठरवून त्याप्रमाणे व्यवस्था करणे.

६. अर्थचिटणीसांची कामे पुढीलप्रमाणे

✻ सभासदांची यादी अद्ययावत राखणे.
✻ डेक्कन जिमखाना क्लबचे येणे काळजीपूर्वक वसूल करणे त्यापैकी भांडवली रक्कमा विश्वस्तांच्या हवाली करणे.
✻ खर्चाच्या सर्व बाबींवर देखरेख ठेवणे व खर्ची पडणारी बिले व पावत्या बिनचूक असल्याबद्दल खात्री करून घेणे.
✻ जमा खर्चाचा हिशेब ठेवणे, त्याचबरोबर क्रीडा समिती नियामक मंडळाच्या आयव्ययाचा व शिल्लकीचा तपशीलवार तक्ता प्रत्येक

**महिन्यास सादर करणे.**

**✲ साधारण सभेच्या वार्षिक बैठकीच्या आधी भरणाऱ्या क्रीडा समितीच्या आणि नियामक मंडळाच्या सभेस हिशेब तपासणीसाकडून तपासून घेतलेले हिशेब व ताळेबंद सादर करणे व जरूर लागेल ती इतर माहिती पुरविणे. ही सर्व कामे अर्थचिटणीस सरचिटणीसांच्या आदेशानुसार करतात. (घटना व नियम,१९६४)१४**

## REFERANCES:-


1. Sports Authority Of India (2009) Retrieved, Jabuary 14, 2009, from http://en.wikipedia.org/wiki/sports_ authority_of_India.
2. Maharashtriya Mandal (2009) Retrieved, January 14, 2009, from http://www.agashecollege.org.
3. Hanuman Vyayam Prasarak Mandal (2009) Retrieved, January 16, 2009. from http://www.hvpm.org.
4. Tata Football Academy (2009) Retrieved, January 14, 2009, from http://www.iloveindia.com/sports /bodies/sports-authority -India.
5.Deccan Gymkhana (2007) Retrieved, July 30,2008, from http://www.deccangymkhana.co.in/.
6.Deccan Gymkhana (2007) Retrieved, July 30,2008, from http://www.deccangymkhana.co.in/.
७.गोरे,भा.ग.,व लोखंडे,द.भ.(१९६६),संस्थेच्या एकसष्ठाव्या वाढदिवसानिमित्त अहवाल, सेंटेनरी सुवेनिअर.
८.डेक्कन जिमखाना (१९६४), घटना व नियम, पृ.क्र. १
९.तुळपुळे आनंद (२००६), डेक्कन जिमखान्याची विजयी घोडदौड, सेंटेनरी सुवेनिअर.
१०.लोकरे विश्वास (२००६), १९६६ ते २००६ या कालावधीचा अहवाल, सेंटेनरी सुवेनिअर.
११.गोरे भा. ग. लोखंडे द. भ. (२३ ऑक्टोबर १९६६), संस्थेच्या एकसष्ठाव्या वाढदिवसानिमित्त अहवाल, सेंटेनरी सुवेनिअर.
१२.डेक्कन जिमखाना (१९६४), घटना व नियम, पृ. क्र. २
१३.Deccan Gymkhana (2006) Retrieved, June 28, 2007, fromhttp://www.deccangymkhana.co.in/.
१४.डेक्कन जिमखाना (१९६४), घटना व नियम, पृ. क्र१६